# समिती दर्पण

**सप्टेंबर – ऑक्टोबर २०२२**

**विद्यार्थी साहाय्यक समिती** : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


समितीचे साहाय्यदाते, हितचिंतक यांना ही दिवाळी आनंदाची, समाधानाची, संकल्पपूर्तीची, निरामय आरोग्यदायी जावो, ही प्रार्थना.

विश्वस्त, कार्यकर्ते, सल्लागार, कर्मचारी.

# माहेरवाशिणीचा हृद्य सत्कार

## साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. संगीता बर्वे यांचे कौतुक



समाजात मोठा सन्मान मिळवून कर्तृत्ववान मुलगी जेव्हा माहेरी येणार असते, तेव्हा तिच्या स्वागतासाठी, कौतुकासाठी कुटुंबीय आतुरतेने वाट पाहात असतात. तीच आतुरता, लगबग त्या दिवशी विद्यार्थी साहायक समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहात दिसत होती. वसतिगृहाच्या आवारात आणि मोडक सभागृहात फुलांच्या रांगोळ्या काढल्या होत्या, औक्षणाची तयारी करून सर्वांचे डोळे माहेरवाशिणीच्या वाटेकडे लागले होते.

ही माहेरवाशीण होती समितीच्या माजी विद्यार्थिनी बालसाहित्यकार, कवयित्री डॉ. संगीता बर्वे. संगीताताईंच्या 'पियूची वही' या पुस्तकाला नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्या निमित्ताने समिती परिवाराच्या वतीने या कौतुक सोहळ्याचे आयोजन केले होते. संगीताताईंचे आगमन होताच त्यांच्या सहाध्यायी मैत्रिणींनी औक्षण करून त्यांचे स्वागत केले. त्यांना सन्मानाने व्यासपीठावर आणले. समितीचे विश्वस्त भाऊसाहेब जाधव यांच्या हस्ते संगीताताईंचा सत्कार करण्यात आला. समितीच्या माजी विद्यार्थिनी आणि संगीताताईंची मैत्रीण लेखिका डॉ. प्रार्थना सदावर्ते यांनी लिहिलेले मानपत्र प्रदान करण्यात आले. समिती परिवाराच्या वतीने खास माहेरची साडी संगीताताईंना भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. तेज निवळीकर यांनी केले. यावेळी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, माजी विद्यार्थी मंडळाचे सचिव सुनिल चोरे, मनीषा गोसावी, अनिता देशपांडे, डॉ. मानसी आंबीकर, सुनंदा पाटील तसेच संगीताताईंचे पती डॉ. राजीव बर्वे उपस्थित होते. त्यानंतर संगीताताईंचे खेड्यात गेलेले बालपण, लहानपणापासून असलेली वाचन, लिखाणाची आवड, आईवडील- आजीआजोबांचे संस्कार, समितीच्या वास्तव्यात लागलेली शिस्त, कामाची सवय, अडचणींवर मात करून झालेली जडणघडण, कबड्डीपटू म्हणून राज्यभर झालेले दौरे आणि त्यानंतर वैद्यकीय व्यवसाय, लेखन आणि संसार अशी सर्व आघाड्यांवरची सर्कस... हा सारा जीवनप्रवास ॲड. सदावर्ते यांनी त्यांच्याशी मारलेल्या गप्पांमधून उलगडत गेला.

> समितीत आल्यावर आयुष्याचा अर्थ उमगत गेला. येथे एकमेकांना मदत करत, अडचणींवर मात करत आनंदाने जगलो. कमवा- शिका योजनेत दै. 'सकाळ'मध्ये पुरवण्यांच्या घड्या घालायला जायचो. त्यात 'सकाळ'मध्ये पहिल्या पानावर माझा फोटो आला, तेव्हा भारी वाटले. आतापर्यंत समितीतून अनेक कर्तृत्ववान विद्यार्थी घडले आहेत. सध्या येथे असलेल्या विद्यार्थ्यांचे भविष्यही उज्वल आहे.
>
> – **डॉ. संगीता बर्वे**, माजी विद्यार्थिनी,
> साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या बालसाहित्यकार



# मुलींच्या वसतिगृहाचे नगरला भूमिपूजन

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अहमदनगर येथील प्रस्तावित मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन नुकतेच उद्योजक प्रमोद चौधरी यांच्या हस्ते झाले.

परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशनच्या आर्थिक सहयोगातून हे वसतिगृह उभारण्यात येत आहे. ग्रामीण भागातून अहमदनगरमध्ये शिक्षणासाठी आलेल्या ६० मुलींच्या निवासाची सोय या वसतिगृहात होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी साहाय्यक समिती गेल्या सहा दशकांहून अधिक काळ काम करत आहे. समितीसारख्या समर्पित भावनेने आणि सामाजिक दायित्व जपत काम करणाऱ्या संस्था समाजात उभ्या राहाव्यात, असे मत प्रमोद चौधरी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला स्नेहालयचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख, समितीचे खजिनदार संजय अमृते, विश्वस्त तुषार रंजनकर, सुप्रिया केळवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते, समितीचे अहमदनगर येथील कार्यकर्ते रवींद्र देशपांडे, नंदकुमार देशपांडे, सुनीता झिंझाड आदी उपस्थित होते. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी प्रास्ताविकात समितीच्या कार्याचा आढावा घेतला. रवींद्र देशपांडे यांनी आभार मानले.

> समाजसेवेची बीजे पहिल्यापासून घरात रुजलेली आहेत. हा वारसा समर्थपणे पुढे नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. विद्यार्थी साहाय्यक समितीसारख्या निःस्वार्थी भावनेने काम करणाऱ्या संस्थेबरोबर काम करताना आनंद वाटतो. मुलींच्या शिक्षणाला या उपक्रमातून हातभार लागेल.
>
> – **प्रमोद चौधरी**, उद्योजक

> देशासाठी समर्पित चारित्र्यवान विद्यार्थी घडवण्याचे, समाजातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देण्याचे काम विद्यार्थी साहाय्यक समिती करत आहे. चौधरी परिवाराची साथ लाभल्याने हे काम अजून प्रभावीपणे होईल.
>
> – **गिरीश कुलकर्णी**, अध्यक्ष, स्नेहालय

# समितीसाठी योगदानाचा संकल्प

## माजी विद्यार्थिनींचा मेळावा

पुण्यात कामानिमित्त आल्यानंतर आवर्जून समितीत येऊ, समितीतील घडामोडींची माहिती घेऊन, शक्य असेल ते योगदान देऊ, असा संकल्प विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थिनींनी मेळाव्यात केला. हा वार्षिक स्नेहमेळावा १८ सप्टेंबर रोजी समितीच्या आपटे वसतिगृहात झाला. यात माजी विद्यार्थिनींनी आपल्या जुन्या मैत्रिणींबरोबर संवाद साधला.

माजी विद्यार्थी मंडळाच्या उपाध्यक्षा अलकनंदा पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या शशिताई भाटे यांनी सुमित्राताई केरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त ताईंचे समितीसाठीचे योगदान आणि त्यांच्याबरोबर केलेल्या कामाचे अनुभवकथन केले. माजी विद्यार्थी मंडळाच्या सहकार्यवाह मनीषा गोसावी यांनी मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. लजपत भवन वसतिगृहाच्या आवारात बांधण्यात येत असलेल्या विद्यार्थिनींसाठीच्या नवीन वसतिगृहात माजी विद्यार्थिनींच्या नावाने एखादी खोली असावी, त्यासाठी आपण दहा लाख रुपयांचा निधी उभा करावा, असे आवाहन केले. सुरुवात म्हणून स्वतः पाच हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष राजू इंगळे यांनी माजी विद्यार्थी मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. जास्तीत जास्त माजी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी मंडळाचे सभासदत्व घ्यावे, असे आवाहन केले. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीचे सुरू असलेले प्रकल्प, पुढील पाच वर्षांत हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती पीपीटी स्वरुपात दिली.

पुष्पा थोरात- आरोटे यांनी उपस्थित विद्यार्थिनींशी संवाद साधला. विद्यार्थिनींचा स्वतंत्र मेळावा घ्यावा, हे तांबोळी सरांचे स्वप्न होते, याचा उल्लेख त्यांनी आवर्जून केला. नवीन विद्यार्थिनींनी जबाबदारी घेतली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी विद्यार्थिनी मेळाव्यासाठी नेहमीच पुढाकार घेत असलेल्या माजी विद्यार्थिनी सुजाता कोळेकर या जपानमधील क्सेंचर कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टर झाल्या आहेत. त्या मेळाव्याला येऊ शकल्या नाहीत, परंतु माजी विद्यार्थ्यांची जपानला सहल काढल्यास त्यांची व्यवस्था करेन, असे त्यांनी सांगितल्याचे थोरात यांनी सांगितले. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थिनींनी स्वतःची ओळख सांगत समितीसाठी काय योगदान देऊ शकते, याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे नियोजन अनिता देशपांडे व सुनीता पाटील यांनी केले. मेळाव्याच्या शेवटच्या सत्रात मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी केले.




आठवणीचे पान

# लाख मोलाची देणगी



काही माणसे स्वतःच्या कृतीतून, आचरणातून अनेकांचे आदर्श होतात. माझ्या काकांच्या बाबतीत असेच म्हणता येईल. स्वतःच्या कृतीशीलतेतून कितीतरी आयुष्ये त्यांनी घडविली आहेत. गंगाधर रामचंद्र वैद्य गुरुजी (निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी) ज्यांना आम्ही सर्व जण दादा म्हणतो. ते गेली अनेक वर्ष शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहेत. मुलांनी शिकलंच पाहिजे, हा त्यांचा पूर्वीपासून ध्यास आहे आणि त्यासाठी पदरमोड करण्याची त्यांची नेहमीच तयारी असते.

आमच्या अकोले तालुक्यातील (जि. नगर) वेगवेगळ्या शाळांना ते नेहमीच आर्थिक मदत करत आले आहेत, जेणेकरून त्यातून विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळेल. विद्यार्थ्यांनी वाचलं पाहिजे म्हणून त्यांनी पत्नी (माझी काकी) कै. वनिता गंगाधर वैद्य यांच्या नावाने आमच्या गावातील मराठी शाळेत ग्रंथालय सुरू केले आहे. निवृत्त शिक्षकांचे संघटन करून त्यांच्यासाठी सुद्धा त्यांनी मोठे ग्रंथालय उभे केले आहे. दोन- तीन वर्षांपूर्वी ७० वर्षांच्या पुढील शिक्षकांना एकत्र करून त्यांचा त्यांनी खास बहुमान केला. समितीला आत्तापर्यंत त्यांनी चार वेळा देणगी दिली आहे.

त्यांचा वाढदिवस १५ ऑगस्टला असतो. यावर्षी त्यांनी सगळ्यांना सोयीचे म्हणून रविवार ता. १४ ऑगस्ट रोजी ८९ वा वाढदिवस साजरा केला. त्यानिमित्ताने वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांना त्यांनी लाख रुपयांच्या देणग्या दिल्या. त्यापैकी ५१ हजार रुपये त्यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीला दिले. गेली अनेक वर्ष ते वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा काही आनंदाच्या प्रसंगी कमीत कमी एक लाख रुपये देणगी स्वरूपात वेगवेगळ्या सामाजिक संस्थांना देत आले आहेत. त्यामध्ये विद्यार्थी साहाय्यक समिती, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, गावाकडील काही शाळा, अनाथ विद्यार्थ्यांचे आश्रम यांचा समावेश आहे. माझ्या काकू शिक्षिका होत्या, त्यांचे जे काही निवृत्तीवेतन मिळते, त्यातील एक पैसाही स्वतः वापरायचा नाही, उलट त्यात भर टाकून समाजाला द्यायचे, असा त्यांचा निर्धार आहे आणि गेली अनेक वर्षे तो पाळत आहेत. आज वयाच्या ८९ व्या वर्षीही दादांची तब्येत अगदी ठणठणीत आहे. नियमित व्यायाम, योग्य आहार, वाचन, वेळच्यावेळी आरोग्य तपासणी हे त्यांच्या उत्तम प्रकृतीचे रहस्य आहे. आमच्या घरात इंजिनिअर, डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटन्ट, शिक्षक आहेत, त्याचे संपूर्ण श्रेय दादांचे आहे. समितीचे माजी विद्यार्थी आर्किटेक्ट अरविंद वैद्य यांच्याकडून त्यांना १९८६ मध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीची माहिती मिळाली होती, त्यामुळे मला पुण्यामध्ये शिकायला पाठवायचे आणि तेही विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये ठेवायचे हे त्यांनीच ठरवले होते. लग्न जमवण्याची त्यांना आवड आहे. गेली अनेक वर्षे त्यांनी छंद म्हणून तो जोपासला आहे.

नुकत्याच झालेल्या वाढदिवशी त्यांची ग्रंथतुला करून त्यांच्या वजनाएवढी पुस्तके अकोले येथील निवृत्त शिक्षक संघटनेच्या ग्रंथालयाला भेट म्हणून दिली. अहमदनगरला समितीची शाखा काढावी, असा त्यांचा आग्रह होता आणि त्यासाठी मी माझ्यापरीने मदत करीन, असे ते मला म्हणाले होते. १४ ऑगस्टला नगर येथे विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी वसतिगृहाचे भूमिपूजन झाले आणि त्याच दिवशी त्यांनी समितीला ५१ हजार रुपयांची देणगी दिली. शिक्षणामुळेच समाज बदलू शकतो यावर त्यांचा विश्वास आहे. त्याकडे ते व्रत म्हणून पाहतात.

दादांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य लाभो, हीच यानिमित्ताने समिती परिवारातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा !!

**– दिनकर वैद्य**

## पर्यावरणपूरक झिरो बजेट गणेशोत्सव

विद्यार्थी साहाय्यक समितीत दोन वर्षांनंतर यंदा गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. समितीतील गणेशोत्सव हा पर्यावरणपूरक आणि झिरो बजेट असतो. परिसरातील टाकाऊ वस्तू सजावटीसाठी उपयोगात आणल्या जातात. मुलांचे लजपतराय भवन, मुलींचे आपटे वसतिगृह तसेच सुमित्रा सदन या तिन्ही वसतिगृहातील गणेशोत्सवात यंदा वारकरी संप्रदायाच्या विठ्ठल भक्तीचे अतूट नाते आकर्षक देखाव्यांच्या माध्यमातून मांडण्यात आले होते. जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवणाऱ्या संतांचे अभंग आजूबाजूला चित्रबद्ध केले होते. गणेशोत्सवात ज्ञानसत्रांतर्गत तीन दिवस मान्यवरांची व्याख्याने झाली.

> समितीच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणपूरक झिरो बजेट. गेल्या अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या सामाजिक जाणिवांची संकल्पना घेऊन विद्यार्थी हा उत्सव साजरा करतात.
> – **तुकाराम गायकवाड**, कार्यकारी विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

## प्रथम ज्ञानसत्रात गणरायाचे गुणगान

गणेशोत्सवातील प्रथम ज्ञानसत्र १ सप्टेंबरला झाले. यावेळी प्रमुख पाहुण्या अॅड.प्रार्थना सदावर्ते यांनी प्राचीन कथा, जगभरात साजरा होणारा गणेशोत्सव, स्वातंत्र्यलढ्यातील गणेशोत्सवाचे योगदान याविषयी विस्ताराने माहिती दिली. त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल ठेवून नव्या गणेशोत्सवाकडे वळण्याचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना दिला.

## अवयवदानाविषयी मार्गदर्शन

द्वितीय ज्ञानसत्रात डॉ. विनायक कोपरकर यांनी अवयवदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. अवयवदान कसे केले जाते, हे लघुपटाच्या माध्यमातून समजावून सांगितले. अवयवदानाच्या माध्यमातून दुसऱ्याच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

## सीए दाभाडे यांनी उलगडला जीवनप्रवास

तृतीय ज्ञानसत्रात सी.ए. कल्पना दाभाडे यांनी लहानपणापासून सी.ए. होईपर्यंतचा खडतर जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. या वाटचालीत कठीण प्रसंगांना त्या कशा सामोऱ्या गेल्या हे सांगताना, यश मिळवायचे असेल, तर परिस्थिती कधीच आड येत नाही, हे अनुभवातून स्पष्ट केले. यावेळी कल्पनाताईंनी त्यांचे समितीबरोबर असलेले नाते सांगितले.

## प्रदीप मांडके यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

अॅक्सिस बँकेचे माजी वरिष्ठ उपाध्यक्ष प्रदीप मांडके यांनी लिहिलेल्या कर्जे देताना– घेताना; कर्ज – मंजुरी ते कर्जफेड प्रक्रियांच्या 'तपशिलांसह' या पुस्तकाचे प्रकाशन २८ सप्टेंबरला महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार होते. यावेळी मराठवाडा मित्रमंडळ संस्थेचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव उपस्थित होते. या पुस्तकात गृहकर्ज, वाहनकर्ज, शैक्षणिक कर्ज या संदर्भातील संपूर्ण माहिती असून कर्जदार आणि बँक कर्मचारी यांच्यासाठी ते उपयुक्त आहे. सकाळ प्रकाशनाच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

## प्रा. भोसले यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

ज्येष्ठ प्रशासक प्रा. सुभाषचंद्र भोसले यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा नुकताच डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रा. भोसले यांना मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, ह.भ.प. मारोती महाराज कुऱ्हेकर, प्र– कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. नीता मोहिते लिखित 'सृजन यज्ञ' आणि सुभाष महाराज गेठे लिखित 'इंग्रजी चांगदेव पासष्टी' या ग्रंथांचे प्रकाशन झाले.

## गिंडी सरांच्या निधनाने हरपले पितृछत्र



विद्यार्थी साहाय्यक समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतराव गिंडी (वय १०१) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. गिंडी सर यांनी खडकी येथे संरक्षण खात्यातील ऑर्डिनन्स विभागात काम केले. तेथे कार्यरत असताना मोठ्या भावाबरोबर समितीत आले. समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांच्याशी त्यांचा परिचय झाला आणि त्यांच्या सूचनेनुसार समितीच्या कामात लक्ष घालायला सुरुवात केली. नोकरी सांभाळत १९६६ पासून त्यांनी समितीच्या भोजनालयासाठी वेळ दिला. भाजी खरेदीपासून जेवणाच्या दर्जापर्यंत सर्व गोष्टींकडे त्यांचे लक्ष असे. विद्यार्थ्यांना प्रेमाने खाऊ घालण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे विद्यार्थीप्रिय कार्यकर्ता अशी त्यांची ओळख होती. गिंडी सर हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि पालक होते. त्यांचे प्रेमाचे छत्र लाभलेल्या विद्यार्थ्यांपैकी मी एक. मी ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यात आलो. गिंडी सरांनी माझे पालकत्व घेऊन मला वडिलांचे प्रेम दिले. शिक्षण, व्यवहार, नोकरी अशा सर्व गोष्टींत त्यांनी मला पाल्य म्हणून आधार दिला. त्यांच्या आठवणी कायम बरोबर आहे. त्यांचे विचार घेऊन जीवन प्रवास करत आहे. दुसऱ्यास मदत करून मोठे करा, स्वार्थी न राहता दुसऱ्यास सहकार्य करा, ही त्यांची शिकवण अंगिकारण्याचा प्रयत्न करत आहे.

– **आबा देशमुख**, माजी विद्यार्थी

# जीवनमार्गावरील वाटाड्या

**शिंपल्यातील मोती**

दहावीनंतर विज्ञान शाखेला अॅडमिशन घेतली म्हणजे आपल्या आयुष्याचा उद्धार होतो, असा विचार करणाऱ्या हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांप्रमाणे मी पण बारावी विज्ञान शाखेमधून उत्तीर्ण झालो आणि घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीला परवडणाऱ्या, लवकर कमवण्याचे साधन प्राप्त करून देणाऱ्या शिक्षणाच्या वाटा शोधू लागलो. त्यामध्ये सैन्य दलात भरती होणे, हा एकच पर्याय समोर दिसत होता.

काही दिवस शेतमजुरी करून भरतीची तयारी करत असताना, एक दिवस विद्यार्थी साहाय्यक समितीचे माजी विद्यार्थी असलेले माझे चुलत बंधू गणेश काळे घरी आले. त्यांनी समितीबद्दल आणि पुण्याच्या शैक्षणिक दर्जाबद्दल माहिती दिली. वेगवेगळ्या शैक्षणिक पर्यायांबद्दल मार्गदर्शन केले. एव्हाना साधारण शरीरयष्टी असलेल्या माझा प्रचंड स्पर्धा असलेल्या सैन्य भरतीमध्ये निभाव लागणार नाही, हे लक्षात आले होते.



विद्यार्थी साहाय्यक समितीचा पत्ता, गणेशदादांचे योग्य मार्गदर्शन, दोन महिने कॉल सेन्टरमध्ये काम करून कमावलेले ८ हजार रुपये आणि उज्वल भविष्याचे स्वप्न घेऊन पुण्यात पोचलो. ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी समिती एक दिशादर्शक आहे, विद्यार्थी दशेत असताना समितीची शिस्त बरेचदा नको वाटते. प्रचंड ऊर्जेचा स्रोत असलेल्या तारुण्याला ते बंधन असल्यासारखे वाटते. पण आज जेव्हा मागे वळून पाहातो, तेव्हा जाणवते की, योग्य वेळी शिस्त, मार्गदर्शन मिळाल्याचा येणाऱ्या भविष्यावर सकारात्मक प्रभाव पडत असतो, समितीच्या कमवा– शिका योजनेमुळे शिक्षणासाठी लागणाऱ्या वरखर्चात मदत होते, तर विविध शैक्षणिक स्कॉलरशिपमुळे आर्थिक भार कमी होतो. विविध उपक्रम, स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो.

समितीबद्दल कितीही लिहिले तरी कमीच आहे. गणेश दादांचे समितीसंदर्भात मार्गदर्शन मिळणे आणि त्यानंतर समितीमध्ये आधार मिळणे, ही माझ्या आयुष्यातील खूप महत्त्वाची वळणे आहेत. या दोघांनी आयुष्याच्या योग्य वळणावर, योग्य दिशा देत वाटाड्याची भूमिका निभावली.मी समितीमध्ये दोनच वर्ष राहिलो. पण या दोन वर्षांमध्ये समाजातील अनेक प्रख्यात लोकांना भेटण्याची, त्यांचे अनुभव ऐकण्याची, कार्यपद्धती समजून घेण्याची संधी समितीमुळे मिळाली. नवे मित्र जोडता आले. समितीच्या वाचनालयात असलेल्या शेकडो पुस्तकांचा विद्यार्थ्यांच्या मेंदूला गुणकारी खतासारखा उपयोग होतो. नामवंत साहित्यिकांचे साहित्य मला पहिल्यांदा समितीमध्ये वाचायला मिळाले.

समितीमधून बाहेर पडलो, तेव्हा २७ रुपये प्रतितासाने मॅकडोनाल्डमध्ये काम केले. नंतर कॉल सेंटरमध्ये काम करत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातीलअभ्यासक्रम पूर्ण केले. त्यानंतर डीआरडीओ या संस्थेत काम केले. आज onsolve.llc सारख्या बहुराष्ट्रीय संस्थेमध्ये application security engineer सारख्या जटिल क्षेत्रामध्ये वार्षिक १८.५० लाख पगारावर काम करण्याची संधी मिळाली आहे.

– **सचिन हरी काळे**, माजी विद्यार्थी

**समिती वृत्त**



## विद्यार्थ्यांना मिळाला उद्योजकतेचा कानमंत्र

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत आपटे वसतिगृहात उद्योजकता विकास मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ उद्योजक प्रतापराव पवार यांनी विद्यार्थ्यांना उद्योगातील यशाबाबत कानमंत्र दिला.

लहानपणापासूनच उद्योगाचा संस्कार दिला पाहिजे. त्यातून नवी पिढी उद्योगाची कास धरेल. आज अनेक पर्याय, तंत्रज्ञान उपलब्ध आहेत. अपयशातून शिकत जा, यशस्वी उद्योजकासह चांगली व्यक्ती व्हा, असा सल्ला श्री. पवार यांनी दिला. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे अधिकारी सुरेश उमाप यांनी उद्योजकता आणि सरकारी योजना याविषयी माहिती दिली. समितीतील विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या स्टार्टअपचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त सुप्रिया केळवकर, तुषार रंजनकर, ज्योती गोगटे आदी उपस्थित होते.

> नोकरी तुमची गरज पूर्ण करते, तर उद्योग तुमची स्वप्न पूर्ण करतात. उद्योगात भांडवलापेक्षाही मानसिकता महत्वाची आहे. जिद्द, आत्मविश्वास, कठोर परिश्रम आणि बाजारपेठेची जाण असेल तर उद्योगात यश मिळवता येते.
> – **प्रतापराव पवार**, ज्येष्ठ उद्योजक

> महाराष्ट्रात लाखो उद्योग आहेत; परंतु उद्योगात मराठी माणूस नाही. हे चित्र बदलण्यासाठी उद्योजकता विकास केंद्र सुरू करीत आहोत.
> – **सुरेश उमाप**, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त प्रभातफेरी, रक्तदान शिबिर

महात्मा गांधी तसेच भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत व सामाजिक जाणीव प्रकल्पाद्वारे २ ऑक्टोबरला पथनाट्ये सादरीकरण करत जनजागृती प्रभातफेरी तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. आपटे वसतिगृह येथून सकाळी साडेसातला प्रभातफेरी सुरु झाली, समाज प्रबोधनाचे संदेश देणारे फलक, तसेच स्वच्छता जनजागृतीच्या घोषणा देत प्रभात फेरी जगताप डेअरी, वाद्य चौक, दीप बंगला चौक, कुसाळकर चौक मार्गे लजपत भवन येथे सामाजिक जाणीव निर्माण करणाऱ्या पथनाट्य सादरीकरणाने सकाळी साडेआठला फेरीची सांगता झाली. तिन्ही वसतिगृहांच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी जनजागृती फेरीमध्ये सहभाग घेतला होता. दीप बंगला चौक, कुसाळकर चौक आणि लजपत भवन या ठिकाणी स्वच्छता जनजागृतीच्या संदर्भात सादर केलेल्या पथनाट्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर लजपत भवन येथे झालेल्या रक्तदान शिबिरात एकूण ५२ जणांनी सहभाग घेतला. सह्याद्री ब्लड बँकेच्या सहकार्याने हे शिबीर झाले. उपक्रमाच्या आयोजनासाठी विद्यार्थी व्यवस्थापन मंडळाचे सहकार्य मिळाले. समितीचे पर्यवेक्षक, कार्यकर्ते, माजी विद्यार्थी उपस्थित होते.



## जागतिक नदी दिनानिमित्त डॉ. प्रमोद मोघे यांचे व्याख्यान

जागतिक नदी दिनानिमित्त २६ सप्टेंबरला डॉ. अच्युत शंकर आपटे वसतिगृहामध्ये डॉ. प्रमोद मोघे यांचे एक कप चहाचं प्रदूषण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

दैनंदिन जीवन जगताना आपल्या नकळत होणारे प्रदुषण सजगपणे रोखणे, हे आपले कर्तव्य आहे.काळाची पावले ओळखून समृद्ध आयुष्यासाठी आता आपण तत्पर राहणे गरजेचे आहे,फ असे डॉ. मोघे यांनी यावेळी सांगितले. एक कप चहासाठी किती प्रकारचे प्रदूषण होते, हेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर ते प्रदूषण आपण कशा प्रकारे कमी करू शकतो, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभ्यास करत असताना चौकस बुद्धीने विचार करून त्याद्वारे पर्यावरणात सकारात्मक बदल घडवण्याचे आवाहन डॉ. मोघे यांनी विद्यार्थ्यांना केले.



विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. शिवानी इंगळे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रगती जांभळे हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला व आभार मानले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार विद्यार्थी विकास केंद्राच्या अध्यक्षा सुप्रिया केळवकर यांच्या हस्ते करण्यात आला.

## मोडक यांनी उलगडले योगासनांचे महत्त्व

अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. मिलिंद मोडक यांनी सूर्यनमस्कारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. हा कार्यक्रम लजपत संकुलात ४ ऑक्टोबरला झाला. आरोग्यम् धनसंपदा,शत्रू बुद्धी विनाशाय, या वचनाला साजेशा निरोगी आरोग्याकरिता सूर्यनमस्कार हे किती महत्त्वाचे आहेत, सूर्यनमस्कार करण्याच्या पद्धती, मंत्रोच्चारण कसे करावे, सूर्यनमस्कारावर पाश्चात्य देशात सुरू असलेला अभ्यास, सूर्यनमस्कारातील वर्णांची माहिती, सूर्यनमस्काराचे मानवी जीवनातील फायदे याबद्दल माहिती डॉ. मोडक यांनी दिली. यावेळी दिनकर वैद्य यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्यासाठी दररोज योगासने व सूर्यनमस्कार करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमास समितीचे कार्यकर्ते डॉ. अभय व्यवहारे, डॉ. प्रसाद आंबीकर उपस्थित होते.

## लॉ क्लबचे उद्घाटन डिजीटल स्वरुपात

डॉ. आपटे वसतिगृहात २२ सप्टेंबर रोजी 'VVK Law Club'चे (विद्यार्थी विकास केंद्र लॉ क्लब) डिजिटल स्वरुपात उद्घाटन प्रमुख पाहुण्या अॅड. सुप्रिया कोठारी यांच्या हस्ते झाले. यावेळी अॅड. कोठारी यांनी वकील कसा असावा याविषयी मार्गदर्शन केले. वकिली क्षेत्रात कायमस्वरुपी यशस्वी राहण्यासाठी आत्मविश्वास, ज्ञान आणि प्रामाणिकपणा या महत्त्वाच्या गोष्टी असल्याचे त्यांनी सांगितले. भाषा ही प्रोफेशनमध्ये कधीच अडथळा निर्माण करत नाही, कोणत्याही गोष्टीचा स्वतः घेतलेला अनुभवच माणसाला यशस्वी होण्यासाठी मदत करू शकतो, असेही त्या म्हणाल्या. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या शंकांचे अॅड. कोठारी यांनी निरसन केले. कुंदन पठारे, राजेंद्र तातर उपस्थित होते.

## सुमित्रा सदनमध्ये टेबल टेनिससाठी जागा

सुमित्रा सदनमध्ये टेबल टेनिससाठी जागा उपलब्ध करून दिली असून याचे उद्घाटन १६ सप्टेंबर रोजी एकम अॅकॅडमीचे संस्थापक सुबोध कोरडे आणि समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांच्या हस्ते झाले. समितीचे कार्यकर्ते निसार चौघुले यांनी प्रास्तावना केली. श्री. सुबोध कोरडे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व सांगून कोणत्या पद्धतीने प्रशिक्षण शिबिर राबवले जाणार आहे, याबद्दलची माहिती दिली, समितीचे कार्यकर्ते नामजोशी सर, एकम टेबल टेनिस अकॅडमीचे ऋषभ सावंत यांनीही मनोगतात विद्यार्थी जीवनातील खेळांचे महत्त्व अधोरेखित केले. टेबल टेनिस अकॅडमीच्या काही प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. आभार प्रदर्शन अंगारकी मांडे हिने केले.